# मेट्रो- 3 आता 'ॲक्वा लाईन'

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रतिकृतीचे अनावरण

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १८ : मुंबई मेट्रो- ३ मार्गावरील गाडीच्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) मेट्रो- ३ चे डबे बनवण्याचे काम ॲल्स्ट्रॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड या कंपनीला दिले आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गावरील मेट्रो- ३ या भूमिगत मार्गाला 'ॲक्वा लाईन' असे संबोधले जाणार आहे. त्यानुसार डब्याची रंगसंगती व संरचना करण्यात येणार आहे. समुद्र आणि पाण्याचा ताजेपणा व गतीपासून प्रेरणा घेऊन या डब्यांची रंगसंगती ठरवण्यात आली आहे. कधीही न झोपणारे आणि गतिमान शहर अशी मुंबईची ओळख ध्यानात घेऊन मेट्रो- ३ च्या डब्यांची रचना करण्यात आली आहे. गाडीच्या डब्यांसाठी फिका हिरवा (ॲक्वा ग्रीन) आणि फिकट तपकिरी (बेज) या रंगांचा वापर करण्यात आला आहे. फिका हिरवा रंग हे समुद्राच्या लाटांचा प्रवाहीपणा, ताजेपणा आणि गती यांचे; तर फिकट तपकिरी रंग हे आरामदायी प्रवासाचे प्रतीक असल्याचे सांगण्यात आले.

मेट्रो- ३ मार्गासाठी आठ डब्यांच्या एकूण ३१ गाड्या ॲल्स्ट्रॉम कंपनीतर्फे बनवण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया' या संकल्पनेनुसार आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथील कारखान्यात सर्व गाड्यांची निर्मिती होईल. चालकाशिवाय चालू शकेल असे अत्याधुनिक तंत्रज्ञान या गाडीसाठी वापरण्यात आले आहे. प्रवाशांना आरामदायी आणि वेगवान सेवा मिळेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

### सोई-सुविधा



- वातानुकूलनासह आर्द्रता नियंत्रण.
- मनोरंजन, जाहिरातींसाठी एलसीडी.
- मार्गाचा डिजिटल नकाशा, उद्घोषणा.
- आरामदायक आसने, उभ्या राहणाऱ्या प्रवाशांसाठी बार.
- अपंग प्रवाशांच्या व्हील चेअरसाठी स्वतंत्र व्यवस्था.
- सुखकर प्रवासासाठी अद्ययावत एअर सस्पेन्शन.
- प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक डब्यात सीसी टीव्ही.
- अग्निशमन, धूर आणि अग्निरोधक यंत्रणा
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व मेट्रो नियंत्रकादरम्यान ध्वनिसंवाद यंत्रणा

**मेट्रो- ३ च्या डब्यांची निर्मिती पुढील वर्षी नोव्हेंबरपासून सुरू होईल. पहिली गाडी एका वर्षाच्या आत मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे.**

**- अश्विनी भिडे,** व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसीएल